ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–X, Issues– III May - June 2021

# भारतातील पर्यटन व्यवसाय हे दारिद्रय निर्मुलनाचे एक साधन

**डॉ. प्रशांत आर. कांबळे**

*(सहाय्यक प्राध्यापक – समाजशास्त्र विभाग)*

*एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ आर्ट्स, अँन्ड*

*एस.सी.बी. कॉलेज ऑफ कॉमर्स अँन्ड सायन्स फॉर वुमेन, चर्चगेट, मुंबई*

**प्रस्तावना :-**

प्रवास ही एक अतिशय प्राचीन व अपूर्ण अशी गोष्ट आहे. अगदी सुरुवातीपासून मानवाला प्रवासाविषयी अति आकर्षण आहे. सुरुवातीच्या काळात प्रवास हा मनात कोणताही उद्देश किंवा जाणीव न ठेवता आणि साधेपणाने होत असे. प्राचीन काळामध्ये प्रवास करणारे बहुतांश प्रवासी यात्रेकरु किंवा नवीन प्रदेशाचा शोध घेणारे खलाशी किंवा नविन प्रदेशाविषयी कुतुहल असणारे असत. स्थानिक व दुसऱ्या प्रदेशाशी होणारा व्यापार हा प्रवासामागील एक मोठा हेतू असायचा. व्यापारी लोकांनी मोठ्या संख्येनी प्रवास करण्यास सुरुवात केली. व्यापारी संबंधामुळे सांस्कृतिक संबंध निर्माण होवून एकमेकांच्या जीवनाविषयी परिचय होवून ते अधिकाअधिक प्रवास करु लागले.

मानवाच्या दृष्टीने सभोवतालची सृष्टी हा एक अनुभवविषय आहे. जसे गुढ आहे तसेच ते अगाध आहे याच जिज्ञासेतून मानव पर्यटनाच्या माध्यमातून सृष्टीचे वैविद्यपूर्ण ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न करतो आहे. साधारणपणे १७ व्या शतकापर्यंत पर्यटन हे असेच शोधकार्य व व्यापार यासाठीच होते. त्यामुळे पर्यटन व्याप्ती मर्यादित होती.

CC BY

*Aarhat Publication & Aarhat Journals* is licensed Based on a work at *http://www.aarhat.com/amierj/*

जग २० व्या शतकाकडून वाटचाल करीत असतांना इतर बऱ्याच बाबीप्रमाणे पर्यटन क्षेत्रात देखील आमूलाग्र बदल होत आहे. मानव पारंपारिकेत गुंतून न राहता रोज काहीतरी नवीन शोधण्याचा सतत प्रयत्न करीत असतो. याच कल्पनेतून अस्तित्वात असलेल्या पारंपारिक पर्यटनात देखील नवीन नवीन प्रवाह येवून पर्यटनाचे स्वरुप हे आधुनिक होत चालले आहे.

**अध्ययनाचे उद्दिदटे :-**

१) पर्यटन आणि पर्यटन उद्योग म्हणजे काय याचा आढावा घेणे.

२) जगातील प्रथम क्रमांकाचा उद्योग म्हणून पर्यटनाचे महत्व अभ्यासणे.

३) पर्यटन क्षेत्रातील उद्योगाच्या संधीचा आढावा घेणे.

४) पर्यटनामुळे सामाजिक सांस्कृतिक घटकांवर होणाऱ्या परिणाम अभ्यासणे.

५) पर्यटनामुळे आर्थिक घटकावर होणाऱ्या परिणामाचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंधात विश्लेषणात्मक अध्ययन पध्दतीचा उपयोग करण्यात आला असून यासाठी द्वितीयक तथ्य संकलनाचा आधार घेतला आहे. यामध्ये प्रकाशित अप्रकाशित लिखित ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, पुस्तके, मासिके, तसेच इंटरनेटचा उपयोग केला आहे.

**पर्यटनाचा थोडक्यात ऐतिहासिक आढावा :-**

मानवामध्ये प्रवासाची आवड प्रत्येक कालखंडात दिसून येते. प्राचीन काळी मानवाच्या प्रवासाच्या कल्पना आजपेक्षा वेगळया होत्या. आजच्याप्रमाणे पुर्वी प्रवासाचा हेतू फक्त आनंद मिळविणे नसून व्यापार करणे प्रमुख उद्देश होता. तसेच प्राचीन ग्रंथ व ज्ञान संग्रहित करणे, अनुभव घेणे, तिर्थयात्रा करणे हा सुध्दा हेतू होता. व्यापारासाठी प्रवास हे प्राचीन मानवाचे एक महत्त्वाचे वैशिष्टये होते. ऐतिहासिक कालखंडात तेव्हा मानव राज्या-राज्यामधून प्रवास करुन व्यापार करीत असे तेव्हा निरनिराळया राजधान्या, लहान-मोठी शहरे इत्यादींचा प्रवास करुन व्यापार करीत असे. अशा प्रवासातून, व्यापारातून सांस्कृतिक देवाण-घेवाण व परस्परांची जीवनपध्दती विषयी जाण झाली.

इतिहासाच्या नोंदीनुसार फोनिशियन्स हे खऱ्या अर्थाने अवध व्यापारी होत. व्यापारासाठी आवश्यक साधन जो पैसा याचा ाेध याच लोकांनी लावला. भारतात त्या काळी जगभरातून प्रवासी येत. त्यांचा उद्देश व्यापारा बरोबरोच येथील धर्म, शिक्षण, तत्वज्ञान, संस्कृति याविषयी अभ्यास करणे होता. भारतात सम्राट अशोकाने बौध्द धर्माच्या प्रचारांसाठी व्यापक प्रवास केला. धार्मिक कारणासाठी धर्मस्थळांना भेटी देण्यासाठी मध्ययुगात प्रवास करण्याकडे जगातील सर्वच धर्मियांची प्रवृत्ती होती. याच काळात युरोपात धार्मिक पर्यटन मोठया प्रमाणात वाढले. यावरुन असे आढळते की, आज २१ व्या ातकातील पर्यटनविकासाला मागील ऐतिहासाची महत्वाची जोड आहे आणि आजपर्यंत पर्यटन विकासासोबतच त्याचे स्वरुपामध्येही फार बदल

झालेला दिसतो.

भारताला प्रदीर्घ अशी ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक परंपरा लाभली आहे. प्राचीन भारतीय संस्कृती ही जगातील एक प्रगत संस्कृती समजली जाते. यादेशात हिंदू मुस्लिम, जैन, बौध्द आणि ख्रिश्चन धर्मामुळे एक वेगळी व सर्वसमावेशक संस्कृती निर्माण झाली आहे. आज देशात शेकडो धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळे पर्यटन केंद्रे म्हणून प्रसिध्द आहेत. येथील वास्तुचे सौंदर्य जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात. प्राचीन काळामध्ये भारतात विविध उद्देशाने पर्यटन केले जात असे.

**पर्यटनाची व्याख्या :-**

पर्यटन हा अत्याधुनिक असाधारण मानवी आर्थिक व्यवसाय आहे. जरी या व्यवसायाची सुरुवात अगदी साध्या प्रवासापासून झाली असली तरी आज याचे स्वरुप फार क्लिष्ट बनले आहे. मानवी जीवनाच्या अनेक अंगाशी आणि त्यानुसार अनेक ाास्त्रांशी त्याचा निकटचा संबंध आहे. तेव्हा अशा परिस्थितीत पर्यटनाची व्याख्या करणे अतिशय कठिण काम झाले आहे. सुरुवातीपासून असे गृहीत धरले आहे की, 'पर्यटन म्हणजे मानवाचे त्याच्या नेहमीच्या राहत्या ठिकाणापासून इतरत्र झालेले अल्पकालीन स्थलांतर म्हणजे पर्यटन होय'.

संयुक्त राष्ट्रसंघाने १९४५ नुसार 'एखाद्या देशात २४ तासांपेक्षा जास्त आणि कायम स्वरुपाची वस्ती न करण्याच्या हेतूने ६ महिण्यांपेक्षा कमी वास्तव्य करणारी व्यक्ती म्हणजे पर्यटक होय. ही व्याख्या देश जगातील अनेक देशांनी पर्यटनासंबंधी आकडेवारी ठेवण्यासाठी स्विकारली. भारतात पर्यटकांच्या दृष्टीने स्विकारलेली पुढील व्याख्या आहे ती अशी "परदेशी पर्यटक म्हणजे परदेशी परवाण्याने मनोरंजन, अभ्यास, धार्मिक गोष्टी, खेळ, व्यवसाय, कुटुंब, बैठक किंवा विशिष्ट कार्यासाठी भारताला भेट देणारी व किमान २४ तास देशात वास्तव्य करणारी व्यक्ती होय.

मराठी विश्वकोशानुसार "जी व्यक्ति निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी चांगल्या स्थळांना भेट देण्यासाठी किंवा सौंदर्य स्थळांना भेट देणारी व्यक्ति म्हणजे पर्यटक होय.

**पर्यटनाचे प्राचिन ते आजपर्यंतचे बदलले स्वरुप :-**

पर्यटन व्यवसायाचा विकास हा या शतकाच्या उत्तरार्धात प्रामुख्याने सुरु झालेला दिसतो. आर्थिक घटक म्हणून पर्यटन हा आधुनिक उद्योग असला तरी निरनिराळया कारणासाठी प्रवास करणाऱ्या मानवाची परंपरा प्राचिन आहे. तेव्हापासून तर आजपर्यंत आधुनिक पर्यटन व्यवसायाच्या वाटचाली त्याच्या स्वरुपात सातत्याने परिवर्तन झालेले आपण पाहतो. पर्यटन हा एक जागतिक पातळीवरील आर्थिक उद्योग आहे. हा

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–X, Issues– III May - June 2021

जगाच्या सर्वच भागात कमी-अधिक प्रमाणात विकसित झालेला आहे. जगभरातील प्राकृतिक, ऐतिहासिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक भिन्नतेमुळे निर्माण झालेली विविधता आणि त्याबद्दलचे कुतूहल हा पर्यटनाची मुळ प्रेरणा ठरली आहे.

**पर्यटन उद्योगाचे महत्त्व :-**

जगातील बहुतेक देश विशेषत: विकसित देश देशांतील व आंतरराष्ट्रीय पर्यटनाचा विकास करण्याचा प्रयत्न करतात. पर्यटनाचे जसे अनेक चांगले फायदे आहे विशेषकरुन आर्थिक विकासाच्या बाबतीत तसेच त्यांचे तोटे ही आहे पर्यावरण प्रदुषणाच्या बाबतीत.

**पर्यटन रोजगार निर्मितीचा स्त्रोत :-**

पर्यटनामुळे आर्थिकदृष्टया मागासलेल्या देशांना मोठया प्रमाणावर परकीय चलन उपलब्ध होते. पर्यटन मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध करुन देते. पर्यटकांचे भोजन, निवासे, व्यवस्था, मनोरंजन, वाहतूक, मार्गदर्शन इ. क्षेत्रात रोजगार उपलब्ध झाला आहे. यामध्ये कुशल मजुरांबरोबरच अकुशल मजदुरांना देखील रोजगार मिळतो. पर्यटन ही विविधता असलेली अपूर्व घटना आहे. मानवांचे जमिनीवरुन, आकाशातून, समुद्रावरुन प्रवास हा आर्थिक उद्योग बनला आहे. आधुनिक जलद आरामदायी वाहतुकीच्या साधनामुळे दुरदुरच्या ठिकाणी पर्यटन करणे आता सोपे झाले. तसेच एका खंडातून दुसऱ्या खंडात काही तासांत पोहचता येते. यामुळे ट्रॅव्हल व वाहतुकदारांच्या दृष्टीने पर्यटन हा निर्यातभिमुख उद्योग बनला आहे. यामुळे हजारो तरुणांना रोजगार मिळाला आहे. फिरकोळ विक्रेते त्या ठिकाणी नाविन्यपूर्ण वस्तुंची विक्री करतात. भ्रमंतीच्या वेळेस मार्गदर्शक पर्यटकांना मार्गदर्शन करतात. त्यामुळे पर्यटन हा अशाप्रकारे रोजगार निर्मितीचे, विकासाचे साधन बनले आहे. पुर्वी पर्यटन श्रीमंत व धाडसी लोकांपुरतेच मर्यादित होते. परंतु आता कमी उत्पन्नाच्या लोकांतही पर्यटन प्रिय झाले आहे.

भारतात बाहेरील लोक पर्यटनांसाठी फार कमी येतात. त्यातच बलात्कार, अपहरणे, स्त्रियांवरील अत्याचार याबाबतच्या गोष्टी जगभर पसरल्या आहे. पर्यटन धोरणाची अनास्था यामुळे दुसऱ्या लहान देशाच्या तुलनेत पर्यटनकेंद्री बनूशकले नाही.

महाराष्ट्राच्या बाबतीत सांगायचे तर सरकारचे पर्यटन धोरण हे स्थानिक लोकांना रोजगार मिळेल असेच असले पाहिजे. कृषी पर्यटन हा ग्रामिण भागातील आर्थिक उन्नतीचा नवा मार्ग आहे. कोकणातील काही लोक पर्यटन व्यवसायात सहभागी आहे. आरोग्य पर्यटनामुळे केरळ, तामिलनाडुतील लोकांना रोजगार

ISSN–2278-5655
AMIERJ
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–X, Issues– III May - June 2021

उपलब्ध झालेला आहे. जेव्हा लोक पर्यटनासाठी जातात तेव्हा त्या गावातील वैशिष्टये असलेल्या खाद्यपदार्थाचा आस्वाद घेतात त्यामुळे तेथील लोकांना आर्थिक लाभ होतो. रोजगार मिळतो तेथील ठिकाणे पाहण्यासाठी तेथील वाहतुक व्यवस्थेचा वापर करतानाही अनेकांना रोजगार मिळत असतो.

संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार जगात दरवर्षी २० कोटी लोक पर्यटनाच्या निमित्ताने घराबाहेर जातात. आपल्या देशात परदेशी पर्यटक २ टक्के तर देशी पर्यटक ९८ टक्के आहे. यामुळे पर्यटन खात्याच्या अधिकाऱ्यांची चिंता वाढलेली दिसते. जगभरामध्ये सुकर राष्ट्रांमध्ये भारताचा क्रमांक १४४ देशामध्ये ६५ वा लागतो. परंतु पर्यटनामध्ये खर्च करण्यासाठी भारताचा क्रमांक २० वा आहे.

भारतात पर्यटन एक मोठा उद्योग म्हणून पुढे आला आहे. येथे २०१६ अनुसार राष्ट्रीय सकल घरेलू उत्पन्नात (ळक्च) ९.६ टक्के योगदान आहे. तसेच भारतात एकूण रोजगारापैकी ९.३ टकके रोजगार पर्यटन व्यवसायामुळे मिळाला आहे.

विश्व यात्रा आणि पर्यटन परिषदेच्या भारतात २००९-२०१८ च्या दरम्यान पर्यटन विकासाचे केंद्र बिंदु बनेल. तसेच २००७ से २०१७ पर्यंत पर्यटनामुळे ४२ टक्के अतिरिक्त कर मिळण्याची अपेक्षा होती. पर्यटन उद्योग स्थायी रोजगार आणि गरिबी दुर करण्यासाठी महत्वपूर्ण योगदान देवू शकते.

आधुनिक पध्दती व आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पर्यटन व्यवसायाचे स्वरुप पूर्णपणे बदलून त्याचे रुपांतर पर्यटन उद्योगात झाले. पर्यटनाचा मोठया प्रमाणात विकास झाल्यामुळे पर्यटन उद्योग हा शक्तिशाली व परिणामकारक झाला आहे. इंग्लडचे उदाहरण घेतल्यास प्रचंड प्रमाणात लक्षावधी लोकांना रोजगार प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात मिळाला या व्यवसायाचा एकूण उद्योगात वाटा ६ टक्के आहे. तसेच कॅनडामध्ये सर्वात मोठया १० उद्योगांपैकी सर्वात जास्त रोजगार देणारा पर्यटन पहिला उद्योग ठरला आहे. तर परकीय चलन मिळवून देणारा सातव्या क्रमांकावर आहे. यावरुन पर्यटन व्यवसाचे रोजगाराच्या दृष्टीने किती महत्व आहे हे आपणास कळते.

पर्यटन उद्योगाची व्याप्ती विशाल असून अनेक पर्यटन प्रकारांना जागतिक पर्यटन संघटनेने मान्यता दिली आहे. नैसर्गिक, धार्मिक, ऐतिहासिक समाजिक, सांस्कृतिक, वैद्यकिय, कृषी, शैक्षणिक व साहसी पर्यटनाचा समावेश पर्यटन उद्योगात केला आहे. पर्यटन व्यवसाय व रोजगार निर्मितीचे भक्कम क्षेत्र असल्यामुळे शासन पर्यटन उद्योग विकासाला गती, सहकार्य व संधी देते. व्यवसाय विकसीत होण्यासाठी प्रोत्साहन देते. पर्यटनाचा परिणाम आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकांवर होतो. म्हणून पर्यटनाला

जीवनातील अत्यावश्यक घटना असे म्हणतात. अशा महत्त्वपूर्ण उद्योगाची व्याप्ती फार प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे.

भारत हा देश जगातील लोकसंख्येच्या दृष्टीने दुसऱ्या स्थानावर तर क्षेत्रफळाच्या दृष्टीने सातव्या क्रमांकावर आहे. त्याचप्रमाणे भारत हा विविधेतेने नटलेला आहे. भारतात निसर्ग सौंदर्य थंड हवेची व ऐतिहासिक, सांस्कृतिक व प्रेक्षणिय अशा प्रकारची अनेक पर्यटन स्थळे असल्यामुळे दरवर्षी भारतात लाखो विदेशी पर्यटन भेट देतात. पर्यटनापासून परकीय चलन मोठया प्रमाणात मिळून आर्थिक प्रगती व रोजगार चांगल्या प्रकारे मिळविता येते. पर्यटन उद्योगामुळे प्रगत, विकसित देशांचा विकास जलदगतीने होण्यासाठी तर विकसनशील आणि अप्रगत देशांचा विकास होण्यास मदत होते. या उद्योगामुळे प्रत्यक्ष खर्च म्हणजे वाहतूक, निवास व्यवस्था, भोजन इ. समावेश असतो. तर अप्रत्यक्ष खर्चाने अन्नधान्य, डाळी, भाजीपाला, फळे, फर्निचर, खेळाची व करमणुकीची साधने इ. समावेश होतो. पर्यटक आवडी-निवडीच्या वस्तूही पर्यटन करतांना खरेदी करीत असतात. त्यामुळे स्थानिक उत्पादनावर आधारीत हस्त व कुटीर उद्योग स्थापन होवून रोजगार निर्माण होते व उत्पन्नात भर पडते. तसेच या उद्योगामुळे अनेक लहान-मोठया उद्योग म्हणजे हॉटेल, खानावळी, निवास, प्रवासी, संस्था, मार्गदर्शक, वाहतूक, मनोरंजन इ. साहित्याची खरेदी व विक्रीतून मोठया प्रमाणात स्थानिक प्रदेशात रोजगार उपलब्ध होतो.

पर्यटन हा जसा एक आर्थिक व्यवसाय आहे. तसाच तो एक रोजगार उपलब्ध करुन देणारा व्यवसाय आहे. या व्यवसायामुळे विविध प्रकारे रोजगार उपलब्ध होतात. यात अकुशल कामगारांपासून प्रशिक्षित अनुभवी कामगारापर्यंत सर्वांना रोजगार मिळतो. हमाल, झाडूवाले, माळी, स्वयंपाक घरातील इत्यादी लोकांनाही रोजगार मिळतो. या उद्योगाबरोबर संबंधित क्षेत्रात अनेक प्रकारे रोजगार मिळते. उदा. घरगुती साहित्य तयार करणारे, शेतीत काम करणारे, वाहतुकीमध्ये काम करणारे, अशा विविध प्रकारच्या लोकांना पर्यटनामुळे रोजगार प्रगत होतो. पर्यटकाचे स्थानिक अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने बरेच महत्व आहे. ज्या देशातील भाग आर्थिकदृष्टया मागासलेला आहे त्या प्रदेशाच्या विकासाच्या दृष्टीने निश्चितच मदत होते. भारतामध्ये महाराष्ट्रामध्ये असा बराच भाग आहे. जो आर्थिकदृष्टया, रोजगाराच्या दृष्टीने मागासलेला आहे तेथे रोजगारीची समस्या आहे. परंतु तेथे पर्यटनाच्या दृष्टीने फार मोठी संधी आहे अशा ठिकाणी पर्यटन विकासावर भर देवून विकासातील प्रादेशिक असमतोल दुर करता येईल. म्हणून जेथे साधनसंपत्ती कमी आहे किंवा उपलब्ध नाही अशा प्रदेशात रोजगार व उत्पन्नाचे साधन पर्यटन व्यवसाय होवू शकते. आर्थिक

दृष्टीकोनातून पर्यटनाच्या वैशिष्टयांचा विचार केल्यास पर्यटन हा रोजगारमिमुख व्यवसायाचा स्त्रोत म्हणून समोर येतो. पर्यटनामुळे अनेक विविध प्रकारचे रोजगार उपलब्ध होतात. या व्यवसायामुळे कुशल व अकुशल लोकांना रोजगार प्राप्त होतो. पर्यटन उद्योग हा केवळ एका घटकावर चालत नाही तर अनेक सेवा-सुविधांचा समुह आहे आणि हया सर्व सेवा-सुविधा परस्परपूरक आहे.

पर्यटनातून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या विनियोग त्या प्रदेशाच्या आर्थिक विकासाकरिता होतो. भारतामध्ये इ.स. १९९० नंतर अंदमान निकोबार व लक्षद्विप. या ठिकाणच्या पर्यटन विकासावर भर देण्यात आला आणि त्या प्रदेशाचा विकास होत आहे. अशाप्रकारे ज्या ठिकाणी रोजगाच्या दृष्टीने साधनसंपत्तीची कमतरता आहे. अशा ठिकाणी रोजगार व उत्पन्नाचे साधन म्हणजे पर्यटन असते. पर्यटनाच्या माध्यमातून आर्थिक विकास झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. पर्यटनाच्या माध्यमातून पैसा हा अधिकाअधिक खेळता राहिल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होवून देशाची अर्थव्यवस्था विकसित होवून देशाअंतर्गत विविध जनकल्याणाच्या योजना राबविण्याकरिता तसेच अनेक रोजगारनिर्मितीची साधने विकसीत करण्यास मदत होते.

भारतातील बेरोजगारीचे प्रमाण कमी करावयाची असेल तर ज्या ठिकाणी निसर्ग सौंदर्य, ऐतिहासिक क्षेत्राचा विकास करणे गरजेचे आहे. भारत हा अशा गोष्टीनी नटलेला आहे. भारतात आणि जगात सध्या पर्यटनाला चांगले दिवस आहे. उच्च व मध्यम वर्गाकडे आलेला पैसा तेव्हा अशातून पर्यटनातून आनंद, थकवा घालविणे, मौजमजा करणे अशा संकल्पना पुढे येवून पर्यटकांचे प्रमाण दिवसें-दिवस वाढतच आहे. ज्या देशाची लोकसंख्या अफाट आहे जेथे शासन स्तरावर रोजगार निर्माण करणे शक्य नसते अशा ठिकाणी पर्यटनामुळे रोजगार निर्मिती हे उत्तम साधन सद्या भारतात विकसित होवू शकते आणि होत आहे यामुळे गावातील छोटया शहरातील युवकांचे मुंबई, पुणे, बंगलोर, दिल्ली अशा मोठ-मोठया ठिकाणी होणारे स्थलांतर थांबेल. त्यामुळे प्रादेशिक समतोलही बिगडणार नाही.

वर्षानुवर्ष एकाच गावी राहणाऱ्या स्थानिक लोकांना आपल्या गावाबद्दल खडानखडा माहिती असते यांच्या मदतीने प्रत्येक स्थळाविषयी संपुर्ण माहिती स्थानिकांनी एकत्र केल्यास पर्यटनस्थळांचे आकर्षण वाढू शकेल असा युवकवर्ग आपल्या गावाच प्रतिनिधित्व करु शकतो आणि अशातूनच रोजगार निर्मितीचे लक्ष्य काही प्रमाणात पुर्ण होवून बेरोजगारीची समस्येला आळा बसून युवा वर्गाना स्थिरता प्राप्त होईल जेणे करुन त्याचा लाभ संपूर्ण समाजाला देशाला होईल व समाज आर्थिक दृष्टया सक्षम होईल.

**निष्कर्ष :–**

आर्थिक दृष्टीकोनातून पर्यटनाचा विचार केल्यास पर्यटन हा रोजगाराभिमुख व्यवसायाचा स्त्रोत म्हणून समोर आला आहे. पर्यटनामुळे अनेक विविध प्रकारचे रोजगार उपलब्ध होतात. या व्यवसायामुळे अशिक्षितांपासून तर शिक्षित व्यक्तिपर्यंत तसेच अकुशलापासून कुशल व्यक्तिंना रोजगार प्राप्त होतो. पर्यटन व्यवसाय हा आज अनेक देशांचा आर्थिक व्यवस्थेचा कणा म्हणून समोर आला आहे. अनेक लोकांना आपल्या अंगभूत कौशल्याप्रमाणे रोजगार मिळू लागला आहे. अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध घेवून त्यांची आर्थिक प्रगत होवून जीवनमान उंचावण्याला मदत झाली आहे. तसेच पर्यटनामुळे राष्ट्रीय उत्पन्नात सुध्दा वाढ होते हे लक्षात येते.

**शिफारशी :–**

१) जागतिक पर्यटनातील भारताचा हिस्सा वाढविण्यासाठी नवीन पर्यटन धोरण महत्वाचे आहे त्याअंतर्गत अर्थव्यवस्था, सांस्कृतिक वारशाचे प्रोत्साहन, रोजगार निर्मिती, महिला सक्षमीकरण इत्यादी गोष्टींचा या धोरणात विचार केला पाहिजे.

२) देशातील निसर्गरम्य, थंड हवेची ठिकाणे, गिरीस्थाने, अभयारण्ये, ऐतिहासिक व सांस्कृतिक वास्तू अजुनही दुर्लक्षीत आहे. त्यांचा विकास करणे आवश्यक आहे.

३) भारतीय पर्यटन उद्योगाच्या दृष्टीने भारतात वाहतुकीच्या सोयी अपुऱ्या आहे. तसेच पर्यटन स्थळापर्यंत पोहोचण्यासाठी चांगल्या दर्जेदार रस्त्यांची निर्मिती करणे. उदा. रेल्वे, जलमार्ग, हवाई मार्ग, इ.

४) पर्यटनासाठी आवश्यक मनुष्यबळ देशात, राज्यात, विकसित व्हाव म्हणून प्रशिक्षण संस्था सुरु करायला पाहिजे तसेच सद्या शाळा, महाविद्यालय, विद्यापिठाकून पर्यटनाचे विविध कोर्सेस चालविले जावेत जेणे करुन युवा वर्गांना रोजगारांच्या संधी प्राप्त होण्यास मदत होईल.

५) ाासनाने दुर्लक्षीत स्थळांचा विकास करुन आणि नवीन पर्यटन स्थळांचा शोध घेवून ते ठिकाण नोंदणीकृत करुन देशातील शक्य तितकी पर्यटन स्थळे जगाच्या पर्यटनाच्या नकाशावर टाकायला हवीत.

६) प्रत्येक पर्यटन स्थळाचे वर्णन, ऐतिहासिक भौगोलिक महत्व सौंदर्य याचे विश्लेषण करुन उत्तमरीत्या जाहीरात करुन ती पर्यटकांपर्यंत पोहाचविणे.

७) केंद्रसरकारने ठरवून दिलेल्या निकषानुसार भरपूर आणि सार्वजनिक सुविधा असाव्यात तसेच आरोग्य व मलनिस्सारण व्यवस्था सुध्दा असावी. आरोग्याच्या दृष्टीने अस्वच्छता हानिकारक आहे याचा प्रत्यक्ष

परिणाम देशातील पर्यटनावर होतो. परदेशी पर्यटक तसेच देशी पर्यटक सुध्दा पर्यटनाचे ठिकाण निवडतांना तेथील स्वच्छतेविषयी माहिती करुन घेतात.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे शिफारशी असून त्याची योग्य अंमलबजावणी केल्यास देशातील पर्यटन उद्योगाला गती प्राप्त होवून पर्यटनापासून बऱ्याच प्रमाणात रोजगार उपलब्ध होवू शकेल.

**संदर्भग्रंथ :-**

खतीब के. ए. पर्यटन भुगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २००६.

घारपुरे विठ्ठल पर्यटन भुगोल, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

भोसले यशोधरा प्रवास, पर्यटनाचे नवे पैलू.

नागतोडे पी.एम. पारधी दिगंबर, पर्यटन भुगोल, विद्या प्रकाशन, नागपूर.

Mahajan L. C. and Others, Tourism Business, King Books Delhi.

कपूर विमलकुमार : पर्यटन स्थळ एवं मानव संसाधन विकास.

वर्मा अंजली : भारत मे पर्यटन विकास और संभावनाएँ.

Batia A. K. : Tourism Development Principles of Practices.

Gupta V. N. Tourism in India.